MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

Apr. To June 2017
Issue-18, Vol-07

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with OKEN Scanner

27) १९८० नंतरच्या ग्रामीण कवितेतील निवडक कवी
प्रा. विजयश्री गवळी, जि. सोलापूर || 107

28) महिलांचा मानवी हक्कांचे नियोजन समस्या आणि निष्कर्ष
प्रा. इरलापल्ले पल्लवी भागवतराव, जि.बीड || 109

29) बाबुराव बागुलांच्या कथेतील दलित स्त्री
प्रा. सचिदानंद फुलचंद खडके, परभणी || 113

30) प्रक्रियेनुसार दुधाचे विविध प्रकार
प्रा. निमसे शितल एस., अहमदनगर. || 115

31) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विदर्भातील दलित चळवळीतील योगदान
प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे, चंद्रपूर || 119

32) खान्देशातील संत कडोजी महाराजांच्या अभंगातील भक्तीभाव
प्रा. दिनेश हिंमतराव पाटील, जळगाव || 121

33) कीडा क्षेत्रातील उत्तेजक द्रव्यांचे सेवनः एक अभ्यास
डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, प्रा. रत्नाकर बेडगे, लातूर || 124

34) शारिरीक शिक्षणातील विविध कसोटया
प्रा. डॉ. जुझारसिंघ निर्मलसिंघ सिलेदार, नांदेड || 127

35) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वातंत्र्य व लोकशाही संबंधी विचार .....
प्रा. संजय उत्तमराव उगेमुगे, चंद्रपूर || 129

36) वारकरी पंथाच्या तत्वज्ञात्रातील सुबोधता
प्रा. डॉ. एच. डी. आकोटकार, बुलडाणा || 132

37) भूमिहीनांच्या संदर्भात आंबेडकरांचे योगदान
कांबळे विजयालक्ष्मी संभाजी, नांदेड. || 136

38) "अधांतर" नाटकातील पुरूषपात्रे - एक आकलन
डॉ. के. एन. सोनवणे, जळगांव || 139

39) मराठी साहित्यातील एक युग - भाषांतर
डॉ. अरुण कोळी, प्रा. देविदास शिंदे || 141

https://sites.google.com/site/vidyawartajournal — http://www.vidyawarta.blogspot.com

...दव व महानोर यांच्या परंपरेतून आलेली १९८० नंतरची पहिली कविता रोमॅंटीक (सौंदर्यवादी) आहे.

५. ग्रामीण कविता समुह भावनेला प्राध्यान्य देणारी व जीवनाकडे तोड करून अभिव्यक्त आली आहे.

६. जे जे मिळाले नाही उदा. अन्न, पाणी, सन्मान इ. चा बेधडक विचार मांडते.

७. १९९० नंतर ही कविता अधिक वास्तववादी झाली.

८. टिकून रहाणे व संघर्ष करणे ही या कवितेची वैशिष्टये आहेत.

९. नाव घेण्याजोण्या ग्रामीण कवायित्रींची संख्या खूप अल्प आहे.

१. बहिणाबाई चौधरी, २. प्रतिमा इंगोले ३. कल्पना दुधाळ

**संदर्भ सूची :—**

१. ठाकूर रविंद्र / ग्रामीण वाङ्‌मयाच्या इतिहास / सुरेश एजन्सी प्रकाशन, पुणे / पृष्ठ १२३

२. आनंद यादव / ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या /मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे / आवृत्ती दुसरी— १९८४/ पृष्ठ क. १५७ — १५८

३. पवार पंडित / 'टाहो'तील अस्सल ग्रामीण जीवनदर्शन/ साक्षात/ जु ऑ स :२००६ पृ: १३

४. कदम महेंद्र /इंद्रजित भालेराव यांची कविता / सक्षात/ जु आ स २००६

□□□

28

# महिलांचा मानवी हक्कांचे नियोजन समस्या आणि निष्कर्ष

**प्रा. इरलापल्ले पल्लवी भागवतराव**
लोकप्रशासन विभागप्रमुख,
पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा, जि.बीड

**********

**प्रस्तावना :**

जागतीक युध्दाचे परिणाम म्हणजे मानवी अधिकाराचा उगम आहे असे आपण म्हणू शकतो. यातूनच १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने ३० कलमांचा मानव अधिकाराचा जाहिरनामा प्रसिध्द केला. जेव्हा मानवाला समान न्याय, कायदा आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली त्यावेळी समाजात अशी भावना निर्माण झाली की, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, प्रशासकीय, कैटुंबिक आशा प्रत्येक क्षेत्रात महिलांना देखील समान अधिकार प्राप्त झाले आहेत. तेव्हा महिलांच्या सक्षमीकरणाची प्रक्रिया वेगाने होणार आहे आणि हे बरोबर आहे. समाजातील काही वाईट प्रवृत्तींच्या लोकांना बाजूला सारले तर खरोखरोच महिलांची प्रगती प्रत्येक क्षेत्रात झापाट्याने होत आहे. आज महिलांसाठी राजकीय क्षेत्रात ५० % आरक्षण दिलेले आहे आणि भविष्यात प्रत्येक क्षेत्रात असेच ५० % टक्के आरक्षण निर्माण होईल. थोडक्यात स्त्री-पुरूष समानतेचे बीज रोवत आहे. परंतु आपल्याकडे स्त्री-पुरूष समानता म्हणले की, स्त्रीयांनी पुरूषांची कामे करणे आणि पुरूषांनी स्त्रियांच्या कामात मदत करणे एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले नाही तर समानतेच्या नावाखाली केवळ उच्छाद मांडला गेला आहे. त्याचा गैरफायदा घेण्यात येत आहे.

स्त्री आणि पुरूष दोन्ही वेगळे घटक आहेत. दोघांनीही आपापल्या मर्यादेने राहिले पाहिजे. प्रसिध्द लेखक ल्युस इरगीरी स्त्री-पुरूष समानतेबाबत असे म्हणतात की, "स्त्री आणि पुरूष हे दोन भिन्न प्रकार आहेत आणि निसर्गानेच त्यांना वेगवेगळे निर्माण केलेले आहे. तेव्हा त्यांनी आहे त्या रूपातच स्वतःला घडविले पाहिजे. "[१] प्रत्येकाला आपले स्वतःचे अधिकार आहेत आणि जन्मानेच ते त्यांना प्राप्त होतात. मातृत्वाचा अधिकार निसर्गाने फक्त स्त्रिलाच दिलेला आहे. त्यात तिचे स्थान उच्च आहे. समाजाला असे वाटते की स्त्रीची ओळखं पुरूषांमुळेच झाली पाहिजे. परंतु हे देखील बरोबर आहे की,

प्रत्येक स्त्री आपल्या पुरूषासाठी आपल्या जवळ असलेल्या प्रत्येक गोष्टीचा त्यात करीत असते. म्हणूनच महिलांसाठी असलेल्या मानव अधिकाराचे उल्लंघन पुरूषांकडून वारंवार होत आहे. त्यामुळे सरकारने महिलांसाठी कोणते नियोजन केलेले आहे, भारतीय दंड प्रक्रिया संहितेनुसार कोणते नियोजन केले आहे याचा आभ्यास यात करण्यात येणार आहे.

**उद्देश :**

१) केवळ एक महिला म्हणून तिच्यावर होत असलेल्या अन्यायाचा आभ्यास करणे.

२) भारतीय संविधानाने महिलांना दिलेले अधिकार स्पष्ट करणे.

३) कायदे असून देखील समाजाची रचना महिलेच्या हालाखी परिस्थितीत सुधारणा घडवून आणू शकत नाहीत याच्या मर्यादा तपासणे.

४) प्राचिन काळापासून ते आत्तापर्यंत महिलेला मिळालेल्या अधिकाराचे निष्कर्ष मांडणे.

**१) महिलांच्या सद्यःस्थितीचा आभ्यास :**

महिला अधिकाराच्या रक्षणासाठी निर्माण होणाऱ्या कायद्यामध्ये वारंवार वाढ होत आहे. विविध क्षेत्रामध्ये महिलांनी आपले ध्येय साध्य केले आहेत. महिलांचे शिक्षण, नोकरी, लग्न या विषयी समाजात सकारात्मक बदल होत आहेत. आपली अधुनिक समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था, उदारीकरणाबरोबरच स्वच्छंदता ज्याला आपण आधुनिकता असेच म्हणतो तिकडे वेगोने पुढे जात आहे. त्याचबरोबर महिलांचे शोषण, आत्याचार, लहान मुलींचे शोषण, तलाक, महिला अपराध यासारख्या घटना देखील मोठ्या प्रमाणात घडत आहेत. आपल्या समाजातला हा विरोधाभास नक्कीच अपमानजनक आहे. कारण ज्या समाजात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय प्रशासकीय क्षेत्रात महिलांचे काम करण्याचे प्रमाण वाढत आहे. त्याच समाजात महिलांचा तिरस्कार, शोषण, अपमान याचा स्तर देखील वाढत आहे. त्याच्या हिंसेच्या घटनेत देखील वाढ होत आहे.

संपूर्ण देशामध्ये २००९ मध्ये जवळपास १० हजार पेक्षा जास्त घरगुती हिंसाचाराचे प्रमाण पुढे आले आहेत व दिवसेंदिवस यात वाढच होत आहे. यामध्ये राजस्थान हे राज्य सर्व राज्यापेक्षा पुढे आहे. वास्तवात बघितले तर राज्यस्थान मधिल भंवरीदेवी या महिलेवरील आत्याचारामुळेच विशाखा समितीची स्थापना झाली आहे. तिच्यामुळेच आज महिलांना नोकरीच्या ठिकाणी संरक्षण देणाऱ्या लैंगिक आत्याचार प्रतिबंधक कायद्याची निर्मिती झाली आहे. मात्र तेथील महिला आणखीनही सुरक्षित नाहीत.

महिला अधिकाराचा पुढाकार करणाऱ्या लॉयर्स कलेक्टीव या समितीने २००७ मध्ये एक अहवाल तयार केला, ज्यात असे सांगितले आहे की, "नवऱ्याकडून मारहान करण्यामध्ये जगात भारताचा २५ वा नंबर लागतो. ५४% भारतीय स्त्रीया घरगुती हिंसाचार म्हणजेच नवऱ्यांकडून मारहान होते हे आपल्याला नशीबीने आले आहे असे मानतात."[२] परंतु वास्तविकता अंगी आहे की, देशामध्ये प्रत्येक ६ तासानंतर एका विवाहितेला जाळून, पंख्याला लटकावून, मार-मार मारून तिची हत्या केली जाते. तिला सर्वात जास्त त्रास घरातूनच होत असलेला दिसून येतो. कधी हुंड्यासाठी तर कधी सासू-सासऱ्याची सेवा करीत नाही यासाठी तर कधी जेवण चांगले बनवता येत नाही या नावाखाली तिला नेहमी छळले जाते. घरातील सासरा, दीर, जेठ यांच्याकडून होणारा त्रास केवळ स्वतःची बदनामी होईल म्हणून घरात सांगितला जात नाही. कारण भारतीय समाजात कोणताही अपराध झाला असता स्त्रीलाच जबाबदार धरले जाते.

सरकारकडून महिला साक्षरतेसंबंधी अनेक योजना राबविल्या जातात, पण वास्तवात "राष्ट्रीय सर्वेक्षणानुसार आजही पुरूष व स्त्री साक्षरतेचे प्रमाण ७५.५३ असलेले दिसून येते. माता मृत्यू दरात भारताचा जगात ११ वा क्रमांक लागतो."[३] ग्रामीण भागात दलित वस्तीत माता मृत्यूचे प्रमाण जास्त असलेले दिसून येते. लहान वयात लग्न, लवकर आलेले बाळांतपण, मुलाच्या हट्टासाठी तिची केली जाणारी मानसिक कुचंबना, निष्काळजी या व अशा अनेक कारणांमुळे माता मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. आजही अनुसूचित जाती व जमातीमधील महिलांना सर्वांकडून होणारा त्रास सहन करवा लागतो. यांच्या मुलांना चांगल्या शाळेत प्रवेश दिला जात नाही. "उत्तर प्रदेशातील बलिया जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी दलित महिलेने बनवलेले दुपारचे जेवण खाण्यास नकार दिला होता. अशा महिलासोबत आत्याचाराच्या घटना झालेल्या वारंवार दिसून येतात. काही वर्षापूर्वी गोवाहाटीमध्ये आदिवासी विद्यार्थी संघटनेच्या नावाखाली आदिवासी महिलांकडून अनुसूचित जातीचा दर्जा मिळावा यासाठी एक आंदोलन केले होते. यात एका आदिवासी मुलीला निर्वस्त्र करून तिला मारहान करण्यात आली होती व तेथील जनता चुपचाप हा तमाशा बघत होती."[४] थोडक्यात समाज संवेदनहीन होत आसलेला हा पुरावा आहे.

दररोज महिलांच्या आत्याचारात होत असलेली वाढ एक चिंतेचा विषय बनत आहे. लग्नाला नकार दिला म्हणून आलेला राग, परपुरूषांशी मैत्री केली म्हणून होणारी इर्षा, एकतर्फी प्रेम, छेडछाड, माझी नाही तर कोणाचीही नाही ही भावना या प्रमुख कारणामुळे तिच्यावरील आत्याचारात वाढ होत आहे, पण त्यामुळे आयुष्यभर त्या स्त्रीला शारीरिक व भावनिक त्रास सहन करावा लागतो. तिला तिचे पूर्वीचे आयुष्य कितीही रूपये खर्च केले तरी मिळू शकत नाही.

तिच्यात आत्मविश्वासाच रहात नाही आणि तिचा पुन्हा विवाह होईल ही आशा देखील उरत नाही.

एकंदरीत महिला आत्याचाराची आकडेवारी पहायची असेल तर हुंड्यांसाठी बळी गेलेल्या स्त्रियांची संख्या १९९० मध्ये किती होती ही खालील काही प्रांतांच्या आकडेवारीवरून दिसून येईल.

**तक्ता क्र. १**

**हुंड्यासाठी बळी गेलेल्या स्त्रियांची काही प्रातांची आकडेवारी (१९९०)**

| अ.क्र. | राज्यांची नावे | संख्या |
|---|---|---|
| १. | उत्तर प्रदेश | १५१६ |
| २. | महाराष्ट्र | ८५८ |
| ३. | पं. बंगाल | ८२० |
| ४. | मध्यप्रदेश | ३९७ |
| ५. | आंध्रप्रदेश | ३४४ |
| ६. | बिहार | २४३ |
| ७. | कर्नाटक | २१६ |
| ८. | राजस्थान | १६६ |
| ९. | हरियाना | १२६ |
| १०. | दिल्ली | १०२ |

**स्त्रोत :** डॉ. एस. एस. गाठाळ, 'भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद पृ.क्र. ३४१.

वरील आकडेवारी पाहिली असता आशा गुन्ह्यात न्यायव्यवस्थेकडून ५ % प्रकरणातही स्त्रियांना न्याय मिळत नाही.

**भारतीय संविधानाने महिलांना दिलेले संरक्षण तथा नियोजनः**

भारतीय संविधानाने सर्व जनतेबरोबरच महिलांना देखील सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात बरोबरीचा अधिकार दिलेला आहे. सरकारने वेगवेगळ्या अधिनियमाद्वारे महिलांना विविध अधिकार प्रदान केलेले आहेत. कलमाद्वारे ते आपल्याला खालील प्रमाणे सांगता येईल.

**अनुच्छेदातील विचार**

अनुच्छेद — अनुच्छेदातील विचार

१४ — समानतेचा अधिकार

१५ (१) — धर्म, वंश, जन्म, स्थानाच्या आधारे समानता.

१५ (२) — राज्याच्या अधिकारातील पदामध्ये समानता.

२१ (क) — ६ ते १४ वर्षांच्या बालकांना निःशुल्क शिक्षणाचा अधिकार.

२३ (१) — बालकांसोबत अमानवी व्यवहार करण्यास मनाई.

२४ — १४ वर्षाखालील बालकांना कारखाना, हॉटेल इत्यादी बालकामगार म्हणून न ठेवण्याबाबत.

३९(क) स्त्री-पुरूष दोघांना जीवनासाठी आवश्यक सर्व साधने प्राप्त करण्याचा अधिकार.

३९(ड) वय आणि शक्तीनुसार रोजगार.

५१(क) स्त्री सन्मानाच्या विरोधी प्रथेविरूध्द असणाऱ्या परंपरेचा त्याग करणे.

३२५ लिंग, धर्म, वंशाच्या अधारे अपात्र करू नये.

३२६ लोकसभा, विधानसभेचा अधिकार १८ वर्षापासून आहे.

१३२, १३४ व १३६- स्त्री-पुरूष दोघांनाही समान रूपात याचिका दाखल करण्याचा अधिकार.

**भारतीय दंड प्रक्रिया संहिता :**

१८६० मधील कायद्यातील कलमानुसार

८२ - सात वर्षापेक्षा कमी वयाचा अपराध मान्य केला जाणार नाही.

९७ - वैयक्तिक संरक्षणाचा अधिकार

३१२, ३१३ - गर्भपात करणे हा गन्हा आहे.

३५४ - स्त्री चे चारित्र्य भंग करणे हा दंडनीय अपराध आहे.

३६१ - विवाह, अपहरण यासाठी बळजबरी करणे गुन्हा आहे.

३६६ A - एखाद्या मुलीला वाईट उद्देशाने घेऊन जाणे आपराध आहे.

३६६ B - विदेशातून मुलींना आयात करणे अपराध आहे.

३७२,३७३ - वेश्यावृत्तीसाठी मुलींची खरेदी-विक्री करणे गुन्हा आहे.

३७५,३७६ - बालकांच्या आत्याचारासाठी ७ ते १० वर्षापर्यंत कारावास.

४९८ - विवाहित स्त्रीला फूस लाऊन पळविणे गुन्हा आहे.

४९८ (A) - स्त्री सोबत क्रुरतेचा व्यवहार करणे गुन्हा आहे.

५०९ - विचित्र नजरेने किंवा खानाखुना करून स्त्रिला त्रास देणे अपराध आहे.

**१९७३ मधील कायद्यातील कलमानुसार :**

४३ - परंपरेनुसार मुलीला पाहण्याचा अधिकार आहे.

५१ - स्त्रीयांची तपासणी दुसऱ्या स्त्रीकडूनच केली पाहिजे.

५३२ - स्त्रिची शारीरिक तपासणी अधिकृत महिला चिकित्साकाकडूनच केली जावी.

१२५ ते १२८- पत्नी, मुलगा आई-वडीलांच्या पालनपोषणासाठी जबाबदार आहेत.

१६० - साक्षी पुराव्यासाठी स्त्रीला तिच्या निवासस्थानापासून दुसरीकडे कोणत्याही ठिकाणी हजर राहण्याची आपेक्षा करू नये.

१६४ (A) - आत्याचारित महिलेच्या शारीरिक तपासणी संदर्भात संशोधन करू नयेत.

१९८ - विवाहाच्या विरोधात होणाऱ्या अपराधाबाबतचे नियम."५

**मर्यादा :**

**१. समाजाची रचना आणि विचार कृती :**

जोपर्यंत समाजाच्या विचाराच्या प्रवृत्तीमध्ये बदल होत नाही तोपर्यंत अधुनिकतेचा दावा करणारे समाजात महिलांचे स्थान कितीही उच्च दर्जाचे दाखवत असले तरी प्रत्यक्षात तिला दुय्यम दर्जाच मिळत असतो हे स्पष्ठ आहे. प्रत्येक गोष्ट कायद्यानेच करावी असे नाही तर समाजामधून बदलाची प्रक्रिया उत्सफुर्तपणे येत नाही तोपर्यंत हा भेदभाव राहणारच आहे. स्त्री आणि पुरूष दोघांच्याही मानसिकतेमध्ये परिवर्तन घडणे आवश्यक आहे.

**२. कायद्याचा आधार :**

स्त्रीवर जेव्हा अन्याय होतो तेव्हा तिने कायद्याचा आधार घेऊन आपल्यावर होणाऱ्या आन्यायाच्या विरोधात आवाज उठविला पाहिजे. परंतु प्रत्यक्षात असे होताना दिसत नाही. तिला घरातूनच प्रथमतः सहकार्य मिळत नाही. समाज, राजकीय पक्ष, भ्रष्ट प्रशासन तिला न्याय मिळू देत नाही. कित्येक वेळा महिलांकडे लग्नाचा पुरावाच नसतो. परिणामी तिच्या पतीने दुसरे लग्न केले तरी तिला कोणतीही कायदेशीर कार्यवाही करता येत नाही. परंतु सुशिक्षित महिलांनी आतातरी भविष्यातील धोक्याच्या सूचना लक्षात घेऊन पावले उचलली पाहिजेत. म्हणजे बालविवाह, बहुपत्नीत्व या गोष्टीवर नियंत्रण येईल. तसेच तिला आपल्या पतीच्या संपत्तीत अधिकार सुध्दा प्राप्त होईल.

**३) मानवता पूर्ण व्यवहार :**

नोकरी करणाऱ्या महिलांचे शोषण तसेच घरामध्ये महिलांवर होणारे आत्याचार असे दर्शवितात की, भारतीय महिला आजही पुरूषांच्या आत्याचाराला बळी पडलेली आहे. परंतु त्यातूनही तिने स्वतःला सावरले पाहिजे. थोडक्यात महिलांसोबत मानवतापूर्ण व्यवहार करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

निष्कर्षामध्ये विविध कालखंडात स्त्रियांची परिस्थिती कशी बदलत गेली याचा आभ्यास केला गेला आहे.

**प्राचीन कालखंड :**

प्राचीन कालखंड स्त्रियांसाठी चांगला होता स्त्रियांना बंदिस्त केलेले नव्हते. पुरूषांच्या बरोबरीने स्थान दिले होते. स्त्रिया राजकरण करीत असत, शिकार करीत असत, मनोरंजनाच्या प्रत्येक क्षेत्रात धडे घेत असत. त्या कालखंडातील स्त्री घरकाम, कापड तयार करणे, धनुष्यबाणासारखे युध्दजन्य साहित्य तयार करीत असत. त्यामुळे ती उत्पादन प्रक्रियेतील महत्वपूर्ण घटक होती. धार्मिक कार्यातही स्त्रीला पतीच्या बरोबरीचे स्थान होते.

**मध्ययुगीन कालखंड :**

या कालखंडातील स्त्रियांचे जीवन अतिशय अंधकारमय झांलेले होते. हा कालंखंड मुस्लिम राज्यकर्त्यांच्यां राजकीय वर्चस्वाचा कालखंड असल्याने परकीय आक्रमण, मुस्लिमांची विलासी भोगवृत्ती दासीप्रथा इत्यादी कारणामुळे महिलांची परिस्थिती खूप बिकट झाली होती. मुस्लिमांकडून अनेक हिंदू स्त्रियांना आपल्या जनानखान्यात ओढले गेले. पळवून नेऊन सक्तीने बाटवून त्यांच्याशी विवाह केले. या संकटामुळे अधिच बंदिस्त असलेल्या स्त्रियांवर अधिकच कडक निर्बंध लादले गेले. पुरूषांच्या नियंत्रणातच स्त्रियांनी राहिले पाहिजे असे बोलले जाऊ लागले. केवळ धार्मिक कार्यातच महिला पुरूषांसोबत राहू लागली. तिचे स्थान केवळ चार भिंतीच्या आतच राहिले गेले.

**आधुनिक कालखंड :**

१९ वे शतक हे महिलांच्या विकासाचे द्योतक मानले जाते. संथगतीने का होईना पण याच काळात परिवर्तनाला सुरूवात झाली. महिलांना याच काळात शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला. सती प्रथा, बालविवाह, केशवपण, कन्यावध, कन्याविक्रय, यासारख्या अनिष्ठ प्रथा नष्ट करण्याची सुरूवात याच काळात झाली. अनेक समाजसुधारक आणि क्रांतीकारी चळवळीने स्त्रियांच्या प्रश्नाबाबत देशात जागरूकता निर्माण झाली. महिलांसाठी तिच्या संरक्षणासाठी विविध कायद्यांची निर्मिती झाली. भारतीय संविधानात स्त्री-पुरूष समानतेचे तत्व लागू केले. शिक्षण, नोकरी, राजकारणात संधी प्राप्त होऊ लागली. याचा परिणाम स्त्रियांमध्ये आत्मविश्वास वाढला. आर्थिकदृष्ट्या सबळ होऊ लागली; आपल्या अधिकाराप्रती जागरूक होऊ लागली आणि आताची आधुनिक स्त्री त्या अधिकाराचा वापर करून आपल्यावर होणाऱ्या आन्यायाला विरोधही करू लागली.

थोडक्यात स्त्री आणि पुरूष हे संसाररूपी रथाचे दोन चाके आहेत. दोघांनाही समान अधिकार प्राप्त आहेत. चांगले दर्जेदार जीवन जगायचे असेल तर पुरूषांनी थोडा आपला अहंकार कमी केला पाहिजे आणि स्त्रियांनी स्वतःला कमी न लेखता आत्मविश्वासाने येणाऱ्या अडचणीवर मात केली पाहिजे. तरच त्यांचाही विकास होईल. पर्यायाने देशाचाही विकास होईल.

**संदर्भग्रंथ सूची :**

१) प्रा. सरोदे आरती (२०१२), 'लिंगभेद-नियोजन और समस्याये,' दोन दिवसीय अंतरराष्ट्रीय चर्चासत्र, अमरावती. दि. १६ व १७ मार्च २०१२ चे सोव्हेनिअर, पृ.क्र. A-१३९ पेंग्विन प्रकाशन, अमरावती.

२) राजकुमार (२००५), 'नारी शोषण समस्या और समाधान,' अर्जुन पब्लिशींग हाऊस, न्यू दिल्ली.

३) शर्मा रोमी (सम्पादित) (२००२), 'भारतीय महिलाएँ : नई दिशाएँ,' न्यू दिल्ली प्रकाशन विभाग, सूचना एवं प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.

४) प्रा. सरोदे आरती,-उपरोक्त.

५) भारताचे संविधान, भारत सरकार.